FORM-1 A　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: व्ही. पी. विभाग, पहिली खबर क्र. FIR No.: १०, वर्ष Year: २०१९, दिनांक Date: १२/०२/२०१९

2. (i) अधिनियम Act: मुं.पु. अधिनियम १९८८, कलमे Sections: कलम ७
   (ii) अधिनियम Act: (सुधारित अधिनियम २०१८), कलमे Sections:
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections:

3. (a) अपराधाची घटना: वार Occurrence of offence: Day: सोमवार, तारीख पासून Date from: ११/०२/१९, वेळ Time: ०९:३०, तारीख पर्यंत Date to: ११/०२/१९, वेळ Time: १६:२५

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S.: तारीख Date: ११/०२/१९, वेळ Time: ०९:३०

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference: Entry No.: ०२/२०१९, तारीख Date: १२/०२/१९, वेळ Time: ०६.२५ वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: तोंडी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence: (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S.: दक्षिणेस १६ कि.मी. पुर्व, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No.: निरंक

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: ओवंडी पोलीस ठाणे, ठिकाणाचे नंबर No. if any: मुंबई पुर्व द्रुतगती मार्ग पश्चिम बाजू, गल्ली Ward: पहिला माळा, रस्त्याचे नाव Name of road: ओवंडी

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place: ..., गाव Village: ..., पोस्ट Post: ..., तालुका Taluka: मुंबई, जिल्हा Distt.: मुंबई, राज्य State: महाराष्ट्र

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station: ..., तालुका Taluka: ..., जिल्हा Distt.: ..., राज्य State: ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant: Permanent Address.

   (a) नाव Name: सुरेश
   (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: गुलचंद शर्मा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: २५ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ८१९८८७००७१५
   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: ..., दिल्याचा दिनांक Date of Issue: ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue: ...
   (f) व्यवसाय Occupation: धंदारी (तृतीयपंथी)
   (g) धर्म Religion: हिंदु, जात Caste: ब्राह्मण, जनजात Sub-Caste: ...
   (h) पत्ता Address: खो.नं. २, गल्ली / सर्वे नं. Ward: चाळ नं. १, घर / नाव नंबर House/Name No.: ओम साई सदन, सातपाटे, निळकंठ हॉटेलच्या मागे, फोन / मो. नंबर Phone/M. No.: ..., पॅन नं. Pan No.: ..., वोटर्स नं. Card No.: ...

   रस्त्याचे नाव Road: मुक्ती नगर, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: चेंबूर, मुंबई - ७१, गाव Village: ..., पोस्ट Post: ..., पो. स्टे. P. Stn.: ...

   तालुका Taluka: ..., जिल्हा Distt.: ..., राज्य State: ..., सध्याचा पत्ता Present Address: ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   दिपक हरिभाऊ स्वराज, वय - ४८ वर्षे, धंदा - नोकरी - सहाय्यक पोलीस निरिक्षक (तडीपार अधिकारी), ओवंडी पोलीस ठाणे, ओवंडी, मुंबई - ब.नं. - १४५/८, न्यु पोलीस लाईन बिल्डींग, पहिला माळा, रूम नं. ४, ओडिवाडा, मुंबई - १४
   मो. क्र. ९०८२३१७११७, ९८६८९८०६५८१

इ

यातील फिर्यादी सुरेश लालचंद शर्मा, वय - २५ वर्षे, रा. ठि. रुम नं. २, चाळ नं. १, ओम साई श्रद्धा सोसायटी, निळकंठ हॉटेलच्या मागे, मुकुंद नगर चेंबूर, मुं. ७१ यांचा दि. १७/०२/२०१८ रोजीचा मराठीत टंकलिखित केलेला फिर्यादी जबाब हीच गुन्ह्याची प्रथम खबरी म्हणून संबोधण्यात आला असून सोबत जोडण्यात आला आहे.

समक्ष

सुरेश ला. शर्मा

(गणेश कानडे)
पोलीस निरीक्षक
गु. प्र. विभाग
मुंबई.

फिर्याद दिनांक -- ११/०२/२०१९

सुरेश लालचंद शर्मा वय २५ वर्षे, धंदा-- देवदासी (तृतियपंथी), रा.ठि. -- रुम नं. २, चाळ नं. १, ओमसाई श्रध्दा सोसायटी, निलदुर्गा हॉटेलजवळ, मुक्ताई नगर, चेंबुर, मुंबई ७१. मोबाईल नं. ८१०८८७०७१५

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझ्या कुटूंबासमवेत जन्मापासून रहावयास आहे. मी देवदासी (तृतियपंथी) असून नाचगाणे करुन मिळणाऱ्या पैशावर माझे व माझे कुटुंबाचे गुजरण करतो.

माझ्यावर चार महीन्यापूर्वी दुखापतीचा गुन्हा नोंद क्र. २५४/१८ अन्वये गोवंडी पोलीस ठाण्यास नोंद झाला होता व नमूद गुन्हयात मला अटक करण्यात आली होती. त्यावेळी नमुद गुन्हा हा गोवंडी पोलीस ठाण्याचे पोउनि शेळके यांनी नोंद केला होता. सदर गुन्हयातील दोन आरोपींताविरूध्द लोकसेवक खरात यांनी प्रतिबंधक कारवाई केली होती त्यावेळी माझी लोकसेवक खरात यांच्याशी ओळख झाली होती.

दिनांक ०८/०२/२०१९ रोजी गोवंडी पोलीस ठाणे गु.र.क्र. २४/१९ कलम ३२४, ३२५, ३४ भादंवी प्रमाणे गुन्हा नोंद असुन नमुद गुन्हयात माझा मामे भाऊ दिपेश वाघ यास अटक करण्यात आली होती म्हणून मी गोवंडी पोलीस ठाण्यास गेलो असता लोकसेवक खरात साहेब यांनी मला सांगितले की, तुझ्या भावावर जर तडीपारची कारवाई करावयाची नसेल तर मला रुपये ५०,०००/-- दयावे लागतील. तडजोडीअंती त्यांनी मला रुपये २५०००/-- दयावयास लागतील व सदरची रक्कम दिनांक ११/०२/२०१९ रोजी गोवंडी पोलीस ठाण्यास घेवुन येण्यास लोकसेवक खरात यांनी मला सांगितले.

लोकसेवक खरात, सहाय्यक पोलीस निरीक्षक, गोवंडी पोलीस ठाणे, मुंबई यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ११/०२/२०१९ रोजी ०९:३०वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. त्यावेळी पोनि कानडे यांनी लोकसेवक खरात हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा तक्रार अर्ज मला लिहीता येत नसल्याने माझे विनंतीवरून मी सांगितल्याप्रमाणे मराठीत टंकलिखीत करुन घेतला व तो मी वाचुन त्यावर माझी सही केली. त्यानंतर पोनि कानडे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. त्यावर पोनि कानडे यांनी घटनेबाबत पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि कानडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि कानडे यांनी स्वतः स्वाक्षरी करून सदरचा तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि. कानडे यांनी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले असता मी त्यास नकार देवुन जर माझेसह पंच आले तर आलोसे यास संशय येंण्याची शक्यता आहे त्यामुळे पोनि कानडे यांनी पंच क्र १ यांना माझेशी काही अंतर ठेवुन पडताळणी कामी येण्यास सांगितले सदर पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे दि. ११/०२/२०१९ रोजी मला लोकसेवक खरात यांचे गोवंडी पोलीस ठाणे मुंबई येथे पडताळणीकरीता मला डिजीटल रेकॉर्डर लावून व पंच क्रमांक १ धायगुडे यांना काही अंतर राखुन भेट घेण्यासाठी पाठविले असता लोकसेवक खरात यांची पोलीस ठाण्याच्या पहील्या मजल्यावर माझी भेट झाली व लोकसेवक खरात हे मला पंच क्र. १ यांच्यासमक्ष गुन्हेप्रकटीकरण अंमलदार कक्षात घेवुन गेले. त्यावेळी लोकसेवक खरात व माझे मामेभावावर नोंद गुन्हयाबाबत चर्चा झाली. त्यावर लोकसेवक खरात यांनी माझे मामेभाउ नामे दिपेश वाघ याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई न करण्यासाठी

सुरेश ला. शर्मा

२५०००/– रक्कमेची लाचेची मागणी केली व लाचेची रक्कम मी सेशन कोर्टातुन परत आल्यावर तुला फोन करेन तेव्हा तु लाचेची रक्कम पोलीस ठाण्यास घेवुन ये, असे सांगितले.

त्यानंतर मी पुन्हा पोलीस वाहनाजवळ पंचासह आलो असता पो.नि. कानडे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला व झालेल्या संभाषणाची हकीकत विचारली असता, व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकुन लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यांनी लाचेची रक्कम ते सत्र न्यायालयाचे काम संपवून पोलीस ठाण्यास परत आल्यावर मला फोन करुन बोलविल्यावर लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितली. मी व कारवाई पथक असे गोवंडी परीसरात शहीद अशोक कामठे उदयान गोवंडी येथे थांबलो असता लोकसेवक खरात यांची सेशन कोर्ट वरुन पोलीस ठाण्याचे वेळ झाल्याने पोलीस पथकासह पोलीस ठाण्याचे जवळ शताब्दी हॉस्पीटल जवळ येवुन थांबलो असताना वेळ १७.०९ वाजताचे दरम्यान लोकसेवक खरात यांच्या मोबाईल क्र. ९०८२३१७११७ वरुन माझे मोबाईल क्र. ८१०८८७०७१५ वर कॉल आला. मी कॉल घेण्याआधीच कॉल कट झाल्याने मी समजलो की, लोकसेवक खरात हे पोलीस ठाण्यास आले आहेत. आम्ही थांबलो असलेल्या सरकारी वाहनात लागलीच वाहन चालक पो.शि.चा.क्र. ०९०००९/महारनूर यांनी माझ्या ताब्यातील रु. २५०००/– रुपये २००० चे १२ नोटा व रुपये ५०० चे २ नोटा माझ्याकडून घेवुन त्यांचे को–या कागदावर क्रमांक नोद करुन सदर नोटांना त्यांच्याकडे असलेली अॅन्थ्रेसिन पावडर लावून सदरच्या नोटा माझ्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवल्या. सदरच्या नोटा हया जेव्हा लोकसेवक मागतील तेव्हाच शर्टाच्या खिशातून उजव्या हाताने काढून लोकसेवकास देण्यास सांगितल्या. तसेच पोलीस निरीक्षक कानडे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या शर्टाच्या आतील बनियनच्या आतील बाजुस लावला. नंतर मी व पंच क्र. १ धायगुडे असे रिक्षाने गोवंडी पोलीस ठाण्यास आलो असता पोलीस ठाणे पासुन काही अंतरावर रिक्षा थांबवुन मी पुढे व काही अंतरावर पाठोपाठ पंच क्र १ असे पोलीस ठाण्याच्या आत येवुन पहील्या मजल्यावर आलो असता लोकसेवक हे त्यांच्या तडीपार कक्षात बसले होते. त्यांनी मला पाहताच तडीपार कक्षातुन बाहेर येवुन बाजुला असलेल्या गुन्हेप्रकटीकरण अंमलदार कक्ष असा दरवाजावर बोर्ड असलेल्या रूममध्ये घेवुन गेले त्यावेळी तेथे पंच क्र १ हे काही अंतरावर जिन्याजवळ उभे होते मी व लोकसेवक खरात गुन्हेप्रकटीकरण अंमलदार कक्षात जावुन बसलो असता गुन्हे संदर्भाने आमच्यात चर्चा होवुन लोकसेवक खरात यांनी माझेकडे पैशाची मागणी केली असता मी त्यांना ''तुम्ही सांगितल्याप्रमाणे २५०००/– रूपये आणलेले आहेत'' असे म्हणुन मी माझ्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवलेले २५०००/– लाचेची रक्कम उजव्या हाताने काढुन ती पुढे केली असता लोकसेवक खरात यांनी उजव्या हाताने स्विकारून ती रक्कम दोन्ही हातांनी हाताळुन उजव्या हाताने त्यांनी परिधान केलेल्या गणवेशाच्या शर्टाच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी लागलीच पोलीस निरीक्षक कानडे यांनी सांगितल्या प्रमाणे पोलीस निरीक्षक विनोद पवार यांच्या मोबाईल फोन क्र. ९८७०३४२२७३ या फोनवर मिसकॉल करुन लोकसेवक खरात यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियाजित इशारा दिला असता पोलीस निरीक्षक कानडे, पोलीस निरीक्षक विनोद पवार व पो.शि. ०५५३८/मिरगने व पो.शि. ०३१३४३/सोरटे असे लागलीच गोवंडी पोलीस ठाण्याचे पहिल्या मजल्यावरील गुन्हे प्रकटीकरण पथक कक्षात आले व त्यांनी लोकसेवकास ताब्यात घेतले. तसेच पो.नि.कानडे यांनी लोकसेवकाने लाचेची रक्कम कोठे ठेवली आहे याबाबत माझ्याकडे विचारणा करताच मी लोकसेवकाने घेतलेली लाचेची रक्कम हि त्यांच्या गणवेषाच्या शर्टाच्या उजव्या खिशात ठेवल्याबाबत त्यांना सांगितले. तेव्हा पोलीस पथकाने पंचासमक्ष लोकसेवक खरात यांना रंगेहाथ पकडले.

तरी यातील लोकसेवक खरात यांनी माझ्या मामेभावास दुखापतीच्या गुन्हयात अटक झाल्यानंतर त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई न करण्याकरीता रु. ५००००/– लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रुपये

सुरेश जा. शर्मा

२५०००/- लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

सुरेश ला. शर्मा

( गणेश कानडे ),
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ नाही
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ........ —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........ —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे मामेभाऊ दिपेश वाघ यांचे विरुध्द नोंद असलेल्या गुन्ह्यात प्रतिबंधात्मक कारवाई न करण्याकरीता आलोसे यांनी फिर्यादीकडे रु. ५०,०००/- ची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. २५,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे लाचेच्या स्वतःसाठी गैरलाभ स्विकारले म्हणुन भ्र.प्र. अधिनियम १९८८ (सुधारित अधिनियम २०१८) कलम-७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
श्री. गणेश मधुकर कानडे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........,
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)
सुरेश ला. शर्मा

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name .. गणेश मधुकर कानडे
पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र. विभाग, मुंबई.
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**